## <u>विशेष दिवाणी दावा क्र.६५/२०२४ मधील नि. १७ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी याकामी त्यांची कैफीयत व जबाब दाखल करणेस झालेला विलंब माफ करून कैफीयत दाखल करून घेणेविषयी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द् अग्रहक्क ठराव करुन मिळणेसाठी, खरेदीखत रद्द होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीचा मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी प्रस्तुत दावेचे कामी हजर झाल्यानंतर दाव्याच्या कामी आवश्यक असणारी माहीती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना सदर दावेचे कामी आपली कैफीयत दाखल करण्यास सुमारे २० दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब, प्रतिवादी यांची कैफीयत दाखल करणेस जो विलंब झालेला आहे तो विलंब माफ होवुन कैफीयत दाखल करणेची परवानगी मिळणेसाठी त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आपली हरकत नोंदवून अर्ज रद्द करणेविषयी विनंती केली आहे.

२. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे अवलोकन केले. तसेच या कामातील कागदपत्रे पाहिली असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना नोटीसीची बजावणी दि.०६.०६.२०२४ रोजी झाली असून ते याकामी दि.२५.०६.२०२४ रोजी आपल्या वकीलांमार्फत हजर झालेले आहेत व त्यानंतर त्यांनी आपले म्हणणे मुदतीत दाखल केलेले दिसून येत नाही. परंतु, असे जरी असले तरी याकामी जर प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी सदर म्हणणे कामात सामील झालेस मुळ अर्जाचा निकाल गुणदोषावर होईल. ही बाब खरी आहे की, प्रतिवादी यांनी सदरकामी म्हणणे दाखल करण्यास विलंब केलेला आहे. त्यामुळे त्यांचेवर खर्च लादणे येथे योग्य व न्यायोचित होईल. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तुत अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजूर होण्यास पात्र आहे,

## <u>आ दे श</u>

१. प्रतिवादी यांचा अर्ज रक्कम रु.२००/— (रुपये दोनशे मात्र) खर्च वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी यांची कैफीयत पटलावर घेण्यात यावी.

Sd/-xxx

**(आर. एस. कानडे)**

**दि. २२.१०.२०२४.** **दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिन्नर.**